महाराष्ट्र कारागृह व सुधारसेवा विभागातील अधिकारी व कर्मचारी यांना देण्यात येणा-या अतिकालीक भत्त्याचे (आहार भत्ता) दर सुधारीत करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
गृह विभाग

शासन निर्णय क्रमांकः जेएलई-१११७/११७३/प्र.क्र.२९०/भाग-१/तुरुंग-१

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक: २५ मे, २०१८.

वाचा:-

(१) गृह विभाग,शासन निर्णय क्रमांक,संकीर्ण-१००२/३५४/प्र.क्र.३४/पीआरएस-१ दिनांक ४ फेब्रुवारी २००६.
(२) गृह विभाग,शासन निर्णय क्र.जेएलई-१०१०/५३६/ प्र.क्र.१८८/पु.बां.क्र.१२०/तुरुंग-१ दिनांक २६ एप्रिल २०१६.
(३) अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य,पुणे-१ यांचे पत्र क्र.अपोमसंवकामनि/पुणे/क-५/पोप्रभत्ते/८२६३/२०१७ दिनांक २०/९/२०१७.
(४) अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य,पुणे-१ यांचे पत्र क्र.अपोमसंवकामनि/पुणे/क-५/पोप्रभत्ते/१०३७१/२०१७ दिनांक २२/११/२०१७.

प्रस्तावना:-

महासंचालक,कारागृह,महाराष्ट्र राज्य,मुंबई यांच्या अंतर्गत कार्यरत असलेल्या खालील सर्व कारागृह अधिकारी/कर्मचारी यांना पुढील प्रमाणे अतिकालीक भत्ता (आहार भत्ता) या सदराखाली सुधारीत दराने विशेष अतिकालीक भत्ता (आहार भत्ता) देण्यास संदर्भ क्र-०१ अन्वये दिनांक ४ फेब्रुवारी २००६ मान्यता देण्यात आलेली आहे.

अ) तुरुंग अधिकारी श्रेणी-१ व तुरुंग अधिकारी श्रेणी-२	रुपये ३६/-(रूपये छत्तीस फक्त)
ब) सुभेदार,हवालदार,रक्षक	रुपये ३०/-(रूपये तीस फक्त)

२. राज्यातील कारागृहात वाढती बंदयांची संख्या व त्यामुळे कारागृहातील गणवेशधारी अधिकारी/ कर्मचारी यांचे समोर आव्हाने वाढलेली असून कारागृहात बंदीस्त असलेल्या बंदयांना व्यवस्थित संभाळून ठेवण्याची जबाबदारी त्यांची असते.तसेच कारागृहात कोणताही अनूचित प्रकार घडणार नाही याबाबत खबरदारी घ्यावी लागते ही सर्व कामे करणे मोठया जिकरीचे झाले आहे.सातत्याने कारागृह अधिकारी/कर्मचारी यांना बरेचदा १२ तास व त्यापेक्षा जास्त कालावधीसाठी सदैव कारागृहात कर्तव्य बजावावे लागते त्यामुळे कारागृह अधिकारी व कर्मचारी शारिरीकदृष्टया सक्षम आणि त्यांचे आरोग्य व मनोधैर्य उत्कृष्ट ठेवण्यासाठी उत्तम आहार मिळणे देखील आवश्यक आहे. तसेच पोलीस विभागासाठी

निर्गमित केलेल्या शासन निर्णय,गृह विभाग,पीएए-०३०४/सीआर-१२/पोल-५(अ) दिनांक २१ फेब्रुवारी २००४ मधील अ.क्र.०६ मध्ये २०० दिवसाची मर्यादा नमूद केलेली आहे.परंतू गृह विभाग,शासन निर्णय क्रमांक-पीएए ०३०४/ सीआर-१२/पोल-५,अ दिनांक २० जुलै २००४ अन्वये शासनाने पोलीस विभागातील अधिकारी/कर्मचारी यांची २०० दिवसाची मर्यादा काढून टाकलेली आहे परंतु कारागृह विभागाच्या संदर्भ क्र.०१ च्या शासन निर्णयामध्ये याचा कोणताही उल्लेख नव्हता.त्यामुळे त्याचे स्पष्टीकरण आवश्यक होते.तसेच कारागृह विभागातील अधिकारी/कर्मचा-यांना देण्यात येणारा अतिकालिक भत्ता (आहारभत्ता) प्रदान करण्याच्या कार्यपध्दतीत सुधारणा करुन त्यामध्ये सुसूत्रता व पारदर्शकता आणुन सदर आहारभत्ता ठराविक रक्कमेने मासिक वेतनाबरोबर देवून सदरहू आहारभत्यात वाढ करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णयः-

अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक, कारागृह व सुधारसेवा, कारागृह महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या अंतर्गत कार्यरत असलेल्या खालील नमुद कारागृह अधिकारी/कर्मचारी यांना संदर्भाधिन क्र.१ च्या शासन निर्णयान्वये देण्यात येत असलेल्या अतिकालीक भत्ता (आहारभत्ता) च्या दरात सुधारणा करण्यात येऊन पुढील नमुद अधिकारी/कर्मचारी यांना खालील प्रमाणे सुधारीत दराने प्रतिमाह आहारभत्ता मासिक वेतनाबरोबर देण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

अ) तुरुंग अधिकारी श्रेणी-१ व तुरुंग अधिकारी श्रेणी-२ यांना प्रतिमाह एकूण रूपये १५००/-
(प्रतिदिन रुपये ५०/- प्रमाणे)

ब) सुभेदार,हवालदार,रक्षक यांना प्रतिमाह एकूण रूपये १३५०/-
(प्रतिदिन रुपये ४५/- प्रमाणे)

२. सदर आहारभत्याचे सुधारीत दर दिनांक ०१ जानेवारी, २०१८ पासून लागू करण्यात येत आहे.

३. सुधारीत दराप्रमाणे येणारा खर्च हा मागणी क्रमांक बी-५,मुख्यलेखाशिर्ष-२०५६ तुरुंग अंतर्गत खालील उपलेखाशिर्षाखाली टाकण्यात येऊन सन २०१७-२०१८ च्या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

१) (००१) संचालन व प्रशासन (००)(०१)कारागृह निरीक्षणालय (२०५६००२६)(०१) वेतन
२) (००)(१०१) तुरुंग (००)(०१) मध्यवर्ती तुरुंग (२०५६००३५) (०१) वेतन
३) (००)(१०१) तुरुंग, (००) (०२) जिल्हा तुरुंग,(२०५६००४४) (०१) वेतन

५. सदर शासन निर्णय मंत्रीमंडळाने दिलेल्या मान्यतेनुसार संदर्भ क्रमांक २ येथे नमूद शासन निर्णयान्वये गठीत करण्यात आलेल्या सक्षम समितीने घेतलेल्या निर्णयाच्या आधिन राहून निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०५२५१७२४४२५१२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Saguna G Thengil

Digitally signed by Saguna G Thengil
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=d46fe3bd37ed57f0bdb52fb3a029adc135025943cb93cc90de6ceb564ced5ea3, cn=Saguna G Thengil
Date: 2018.05.25 17:25:46 +05'30'

(स. ग. ठेंगिल)
कार्यासन अधिकारी, गृह विभाग

प्रत,

१) मा. मुख्यमंत्री महोदयांचे प्रधान सचिव,मंत्रालय,मुंबई.
२) मा.राज्यमंत्री (गृह-शहरे) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय,मुंबई
३) अपर मुख्य सचिव (गृह),गृह विभाग,मंत्रालय,मुंबई
४) प्रधान सचिव (अ.व.सु),गृह विभाग,मंत्रालय,मुंबई.
५) प्रधान सचिव (विशेष) गृह विभाग,मंत्रालय,मुंबई.
६) प्रधान सचिव,सामान्य प्रशासन विभाग,मंत्रालय,मुंबई.
७) प्रधान सचिव (वित्त),वित्त विभाग,मंत्रालय,मुंबई.
८) पोलीस महासंचालक,महाराष्ट्र राज्य,मुंबई.
९) महासंचालक (कारागृह) महाराष्ट्र राज्य,पुणे.
१०) पोलीस महासंचालक,कारागृह, महाराष्ट्र राज्य.
११) अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक कारागृह व सुधारसेवा,महाराष्ट्र राज्य,पुणे-१
१२) विशेष पोलीस महानिरीक्षक (कारागृह) दक्षिण विभाग,भायखळा,मुंबई
१३) विशेष पोलीस महानिरीक्षक (मुख्यालय) कारागृह व सुधारसेवा,महाराष्ट्र राज्य, पुणे-१
१४) कारागृह उपमहानिरीक्षक,नागपूर/पुणे/औरंगाबाद
१५) अधीक्षक,मध्यवर्ती कारागृह (सर्व)
१६) प्राचार्य,दौलतराव जाधव तुरुंग अधिकारी प्रशिक्षण महाविद्यालय,पुणे.६
१७) अधीक्षक,जिल्हा कारागृह (सर्व)
१८) अधीक्षक,खुले जिल्हा कारागृह (सर्व)
१९) प्राचार्य,किशोर सुधारालय,नाशिक
२०) अधीक्षक,रत्नागिरी विशेष कारागृह,रत्नागिरी.
२१) संपर्क अधिकारी,स्वतंत्रपूर खूली वसाहत,आटपाडी जि.सांगली
२२) महालेखापाल,महाराष्ट्र-१/२ (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा) मुंबई/नागपूर
२३) अधिदान व लेखा अधिकारी,मुंबई
२४) निवासी लेखा परीक्षा अधिकारी,मुंबई
२५) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी (सर्व)
२६) उपकोषागार अधिकारी (सर्व)
२७) गृह विभाग,बीयुडी-१,मंत्रालय,मुंबई-३२
२८) निवडनस्ती-तुरुंग-१.